वाचले :- १) महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र. घभाभ-१०१५/प्र.क्र.१९/ सेवा-५ दिनांक १६ डिसेंबर २०१६

२) मा आयुक्त यांचेकडील दिनांक २०/१२/२०१६ चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८. लेखा विभाग
क्र. लेखा/१अ/कावि/११७३/२०१६
दिनांक :- २०/१२/२०१६

**विषय :- राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना घरभाडे भत्ता मंजूर करणेबाबत...**

**आदेश,**

महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील उपरोक्त वाचले क्र. १ चे शासन निर्णयासोबतचे जोडपत्रानुसार घरभाडे भत्ता मंजूरीकामी पिंपरी चिंचवड शहराचे सुधारीत वर्गीकरण 'एक्स वर्ग' शहरामध्ये असे केले आहे. सदर शासन निर्णयानुसार 'एक्स वर्ग' शहरामध्ये वर्गीकरण केलेले शहरांना माहे डिसेंबर २०१६ पासुन ३०% घरभाडे भत्ता मंजूर केला आहे, त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आस्थापनेवरील कर्मचा-यांना सुध्दा ३०% दराने घरभाडे भत्ता मंजूर करणे आवश्यक आहे.

सबब मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या आदेशान्वये उक्त नमूद निर्णयाचे अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आस्थापनेवरील कर्मचा-यांना माहे डिसेंबर २०१६ पासुन र.रु २०% ऐवजी ३०% दराने घरभाडे भत्ता अदा करणेस मान्यता देत आहे. सर्व विभागांनी माहे डिसेंबर २०१६ पासूनचे वेतन बिल ३०% दराने घरभाडे भत्ता विचारात घेवून काढावे. या कामी विद्यमान शासन निर्णयातील अटी/शर्ती कायम राहतील.

**(दिनेश वाघमारे)**
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८

प्रति,

**सर्व विभागप्रमुख/शाखाप्रमुख**

प्रत :- १) मुलेप विभाग

२) प्रशासन विभाग